| पी.डब्ल्यू.डी.व्ही. अर्ज क्र.५९/२०२४<br>निशाणी ०६ वर आदेश.<br>(ज्योती किरण ससे व इतर विरुध्द किरण तुकाराम ससे व इतर) | MHAH150017012024 |
|---|---|

१. अर्जदारांनी मुळ अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अन्वये दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदारांने अंतरीम पोटगी म्हणुन एकत्रीत दरमहा रु. २०,०००/– मिळावी अशी मागणी केली आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे–**

२. अर्जदाराने कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ व सामनेवाला क्र. १ हे पती–पत्नी असून त्यांचा विवाह दिनांक ०६/०३/२०१६ रोजी मौजे महालक्ष्मी हिवरे, ता. नेवासा येथे झाला होता. सामनेवाला क्र. २ व ३ हे अर्जदार क्र. १ हिचे सासू–सासरे आहेत. लग्नानंतर काही काळ सामनेवाला यांनी अर्जदार क्र. १ हिस चांगले वागविल्यानंतर ती गरोदर असतांना मुलगा हवा या कारणावरून सामनेवाला तिला त्रास देत. परंतु, अर्जदार क्र. १ हिला मुलगी झाल्याने तिला पाहण्यासाठी सामनेवाला यांच्यापैकी कोणीही आले नाही. त्यानंतर सप्टेंबर २०१७ मध्ये अर्जदार क्र. १ स्वतःहून मुलीसह सासरी गेली. परंतु, तेव्हा तिच्याशी घरातील कोणीही बोलत नव्हते. तिची मुलगी आजारी पडली तरी तिला दवाखान्यात नेत नसत. मुलगी झाली या कारणावरून सामनेवाला तिच्याशी टोचून बोलत. तिला वेगवेगळ्या प्रकारे शारीरिक व मानसिक त्रास देत असत. सामनेवाला यांनी तिला पाच ते सहा वेळा माहेरी हाकलून दिले. दिनांक २८/०८/२०२३ रोजी ती आजारी असतांना देखील सामनेवाला यांनी तिला दवाखान्यात नेले नाही. त्यामुळे नाईलाजास्तव अर्जदार क्र. १ तिच्या वडीलांकडे

औषोधोपचारासाठी गेली. परंतु, सामनेवाला यांनी तिला पुन्हा घरात घेतले नाही.

३. सामनेवाला यांनी अर्जदार यांना घरातून हाकलून दिल्यामुळे ते अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी राहत आहेत. परंतु, त्यांची परिस्थीती गरीबीची आहे. सामनेवाला क्र. १ याने अर्जदार यांना घरातून हाकलून दिल्यापासून त्यांची अन्न, वस्त्र, पोटगीची कोणतीही व्यवस्था केली नाही. अर्जदार क्र. १ हिस उत्पन्नाचे साधन नाही. सामनेवाला क्र. १ याच्याकडे १७ ते १८ एकर शेती असून शेती व दुध व्यवसायातून त्यास वार्षीक ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न मिळते. त्यामुळे सामनेवाला क्र. १ याची दरमहा २० ते २५ हजार रुपये पोटगी देण्याची आर्थीक ऐपत आहे. म्हणून प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांनी एकत्रात रक्कम रुपये २०,०००/– अंतरीम पोटगी मिळण्याची मागणी केली आहे.

४. सामनेवाला यांनी निशाणी क्र. १४ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी अर्जदार व त्यांच्यातील नातेसंबंध मान्य केलेले आहेत. उवरीत संपूर्ण मजकूर नाकारून सामनेवाला यांनी कथन केले आहे की, अर्जदार ही लग्नानंतर घरातील कोणताही कामधंदा करीत नसे. सामनेवाला यास जेवन देत नसे. ती तिला सासरी करमत नाही, तिला शिकलेला व नोकरीवाला नवरा हवा होता असे म्हणून सामनेवाला क्र. १ यास वेगळे राहू किंवा फारकत देवून टाका अशी मागणी करत असे. ती सामनेवाला यांचा अपमान करून वेळोवेळी माहेरी निघून जात असे. सामनेवाला तिला नातेवाईकांच्या मध्यस्थीने समजावून परत घेवून येत असे.

५. अर्जदार क्र. १ ही गरोदर राहिल्यानंतर देखील तिने वेगळे राहण्याची मागणी चालूच ठेवली. दिनांक २६/०४/२०१९ रोजी सामनेवाला क्र. १ हा तिच्या सांगण्याप्रमाणे वेगळा राहत नाही म्हणून ती माहेरी निघून गेली. त्यानंतर सामनेवाला तिला परत घेण्यासाठी गेला

असता तिने फारकत मागणी करून नांदण्यास नकार दिला. सामनेवाला याने वकिलांमार्फत नोटीस देवून देखील ती नांदण्यास आली नाही. नातेवाईकांच्यका मध्यस्थीने सामनेवाला यांनी तिला नांदण्यास आणले. परंतु, तरी देखील तिच्या वागण्यात कोणताही फरक पडला नाही. ती मुलीकडे लक्ष देत नसे. वारंवार भांडणतंटा करून वडीलांना बोलावून माहेरी निघून जात असे. अर्जदार हिने फारकत मिळण्यासाठी एच.एम.पी. क्र. १४७/२०२३ हा अर्ज दाखल केला आहे. ती सामनेवाला यास मुलीला भेटू देत नाही. सामनेवाला हा अर्जदार यांना नांदवण्यास तयार आहे. अर्जदार हिने स्वतःहून नांदण्याचे टाळले आहे. तिने अर्जामध्ये खोटी परिस्थीती नमुद केली आहे.

६. अर्जदार क्र. १ ही शरीराने धडधाकट असून तिच्या आईवडीलांच्या शेतात काम करते. त्यामुळे तिला पोटगीची गरज नाही. सामनेवाला याच्याकडे उदरनिर्वाहाचे काहीही साधन नाही. त्याला आईवडील, भाऊजय व तिची मुले या सर्वांचा मोठा खर्च आहे. त्यामुळे तो अर्जदारास वेगळी पोटगी देवू शकत नाही. म्हणून प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा.

७. अर्जदारांतर्फे विधीज्ञ श्री. जी. यु. भताने व सामनेवाले तर्फे विधीज्ञ श्री. आर. जी. गडाख यांचा युक्तिवाद ऐकला.

८. अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित झाले. त्याचे सकारण निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ही कौटुंबीक हिंसाचाराची पिडीता आहे असे सिध्द करते काय ? | होय. |
| २. | अर्जदार हे अंतरिम पोटगी मिळणेस पात्र आहेत का? असल्यास किती? | होय, एकत्रात रक्कम रु. २,०००/- दरमहा. |

| | | |
|---|---|---|
| ३. | आदेश काय? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिता–**

९. कौटुंबीक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ कलम २३ अन्वये अंतरीम पोटगी मंजूर करण्याकरीता अर्जदाराने कौटुंबीक हिंसाचाराची घटना केवळ प्रथमदर्शनी सिध्द करणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये उभय पक्षकारांमधील विवाह संबंध व सध्या अर्जदार व सामनेवाला हे विभक्त राहत आहेत या बाबी वादातील नाहीत.

१०. अर्जातील कथनानुसार सामनेवाला हे अर्जदार क्र. १ हिस मुलगी झाली या कारणावरून वेळोवेळी टोचून बोलून अपमान करत. मुलगी व तिला आजारी असतांना औषोधोपचार करत नसत. सदरची कथने सामनेवाला यांनी नाकारलेली आहेत. याउलट सामनेवाला यांनी कथन केले आहे की, अर्जदार हिस इतर सामनेवाला यांच्यापासून वेगळे राहायचे असल्याने ती सामनेवाला क्र. १ याच्याकडे वेळोवेळी वेगळे राहण्याची किंवा फारकत देण्याची मागणी करत असे. त्यामुळे ती वेळोवेळी भांडणतंटा करून माहेरी निघून जात असे. तिनेच घटस्फोट मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. परंतु, सामनेवाला यास तिला नांदवण्याची इच्छा आहे.

११. अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांविरूध्द वेगवेगळे आरोप केलेले आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये अद्याप पुरावा सुरू न झाल्याने उभय पक्षकारांनी केलेल्या आरोपासंदर्भात कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. तसेच, अंतरीम पोटगी ठरवण्याकरीता केवळ

प्रथमदर्शनी कौटुंबीक हिंसाचाराची कथने सिध्द होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार व सामनेवाला यांच्यातील नातेसंबंध, ते विभक्त राहत असल्याची बाब उभयतांना मान्य आहे. अर्जदारांनी कथन केले आहे की, सामनवालाकडे नांदत असतांना सामनेवाला क्र. १ याने त्यांच्या आजारपणामध्ये औषोधोपचार केले नाहीत. तसेच, ते अर्जदार क्र. १ हिच्या माहेरी राहत असल्यापासून त्यांच्या अन्न, वस्त्र, पोटगीची कोणतीही व्यवस्था केलेली नाही. म्हणजेच सामनेवाला क्र. १ याने अर्जदार यांच्या उदरनिर्वाहासाठी आर्थीक व्यवस्था केली नाही. सामनेवाला क्र. १ हा अर्जदार यांचा पती व पिता असल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाची कायदेशीर व नैतीक जबाबदारी सामनेवाला क्र. १ याची आहे. परंतु, अर्जदार हे विभक्त राहत असल्यापासून सामनेवाला क्र. १ याने त्यांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी घेतलेली आहे असे सामनेवाला याचे कथन नाही. उदरनिर्वाहाची साधने न पुरवणे किंवा त्याची सोय न करणे हा देखील कौटुंबिक हिंसाचार ठरतो. यावरून प्रथमदर्शनी अर्जदार ही कौटुंबिक हिंसाचाराची पिडीता असल्याचे सिध्द होते. सबब, मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>**मुद्दा क्र.२ करिता–**</u>

१२. अर्जदाराने कथन केले आहे की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने ती स्वतःचा व मुलीचा उदरनिर्वाह करण्यास असमर्थ आहे. याउलट सामनेवाला क्र. १ याच्या कुटुंबाची १७ ते १८ एकर शेती असून शेती व दुध व्यवसायातून त्यास वार्षीक ७ ते ८ लाख रुपये उत्पन्न मिळते. याउलट सामनेवाला याने कथन केले आहे की, अर्जदार क्र. १ ही शरीराने धडधाकट असून ती आईवडीलांच्या शेतामध्ये काम करते. त्यामुळे तिला पोटगीची आवश्यकता नाही. तसेच, त्याला स्वतःला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. अर्जदार व सामनेवाला यांनी

दाखल केलेल्या स्वतःच्या अनुक्रमे निशाणी क्र. १८ व १७ वरील मालमत्ता व दायित्वाच्या शपथपत्रामध्ये वरीलप्रमाणे उत्पन्नाबाबत कथन केलेले आहे. याव्यतिरीक्त अर्जदार व सामनेवाला यांनी एकमेकांच्या उत्पन्नाबाबत कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

१३. परंतु, वर नमुद केल्याप्रमाणे सामनेवाला क्र. १ हा अर्जदार यांचा पती व पिता असल्याने त्यांना उदरनिर्वाहासाठी आर्थीक मदत करणे ही त्याची जबाबदारी आहे. सामनेवालाच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ ही आईवडीलांच्या शेतामध्ये काम करत असल्यामुळे तिला उत्पन्न असून स्वतंत्र पोटगीची गरज नाही. परंतु, सामनेवाल्याने हे मान्य केले आहे की, त्याच्या वडीलांची शेती आहे. याचाच अर्थ तो देखील शेतीमध्ये काम करून उत्पन्न मिळवू शकतो. याउलट त्याने त्याला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही परंतु मासीक खर्च २०,०००/– रुपये आहे असे नमुद केलेले आहे. याशिवाय सामनेवाला हा देखील शरीराने धडधाकट आहे. त्यामुळे तो दखील स्वतःचा व कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याकरीता मोलमजूरी करू शकतो व त्यातून स्वतःच्या तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरीता आवश्यक असणारी रक्कम मिळवू शकतो असे गृहित धरणे योग्य ठरेल. सबब, सामनेवाला क्र. १ याची अर्जदार हिस अंतरीम पोटगी देण्याची आर्थीक ऐपत आहे हे प्रथमदर्शनी दिसून येते.

१४. सबब, सामनेवाला क्र.१ याचे अंदाजे उत्पन्न, अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांच्या मुलभूत गरजा, जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती, उभयपक्षकारांचे राहणीमान आणि सामनेवाला क्र. १ याच्यावरील जबाबदारी विचारात घेता अर्जदार यांना एकत्रात दरमहा रक्कम रुपये २,०००/– (रक्कम रुपये दोन हजार फक्त) प्रमाणे अंतरीम पोटगी मंजूर करणे योग्य व रास्त ठरेल. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तर अंशतः होकारार्थी नोंदवीत आहे.

<u>**मुद्दा क्र.३ करिता–**</u>

१५. उपरोक्त चर्चा लक्षात घेता अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र. ३ करीता खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

<u>**आदेश**</u>

**१.** अर्ज अंशतः खालीलप्रमाणे मंजूर करणेत येत आहे.

**२.** सामनेवाला क्र. १ याने अर्जदार यांना प्रस्तुत अर्ज दाखल तारखेपासून एकत्रात दरमहा रक्कम रु.२,०००/– (रक्कम रुपये दोन हजार फक्त) अंतरिम पोटगी स्वरुपात द्यावेत.

**३.** प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

SANDHYA YUVRAJ SUL Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL Date: 2026.05.16 17:29:15 +0530

(**श्रीमती. एस.वाय.सुळ**)

दिनांक–१६/०५/२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,

ठिकाण – नेवासा नेवासा.